# ‘सेरेब्रल पाल्सी’ग्रस्तांसाठी सल्लाकेंद्र

## मुकुल माधव फाउंडेशनतर्फे उपक्रम

**पुणे :** फनोलेक्स इंडस्ट्रीज लि. ची सीएसआर शाखा असलेल्या मुकुल माधव फाउंडेशनतर्फे सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांसाठी सातान्यातील रुबी हॉल हेल्थ केअर सर्व्हिसेस येथे विशेष सल्ला केंद्र उघडण्यात येणार असल्याची घोषणा फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांनी केली. सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना विशेष खुर्च्या, व्हीलचेअर आणि कमोड चेअरच्या वितरणप्रसंगी सातान्यात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

केंद्रात केईएम रुग्णालयातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मिळविता येईल. त्याशिवाय बालमेंदू तज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांसारख्या तज्ज्ञांची उणीव पूर्ण करण्यास यामुळे मदत होईल.




**मुकुल माधव फाउंडेशनतर्फे सेलेब्रल पाल्सी विद्यार्थ्यांना खुर्चीचे वाटप करताना डॉ. परवेज ग्रँट, रितू छाब्रिया, दमयंतीराजे भोसले, उदयनराजे भोसले, अश्विन मुदगल, शाम देशपांडे, नितीन पाटील.**

रुबी हॉल हेल्थ केअर सर्व्हिसेसची जागा मोफत उपलब्ध करून देणारे रुबी हॉलचे डॉ. परवेज ग्रँट आणि डॉ. भारती पाटील यांनी प्रतिनिधित्व केलेल्या केईएम रुग्णालयाचे डॉ. आनंद पंडित यांचेही छाब्रिया यांनी आभार मानले.

कार्यक्रमात आतापर्यंत एकूण पाच व्हिलचेअर्स, पाच कमोड व्हिलचेअर्स आणि एक सेरेब्रल पाल्सी खुर्ची देण्यात आली.

मुकुल माधव फाउंडेशनने सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना आतापर्यंत ७४ व्हिलचेअर्स आणि ५२ कमोड खुर्च्या भेट दिल्या आहेत. आणखी ३६ खुर्च्या येत्या सोमवारी जिल्ह्यातील विविध शाळांना भेट देण्यात येणार आहेत.

सातान्याचे जिल्हाधिकारी अश्विन मुदगल, सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील, पुणे विभागाचे अतिरिक्त आयुक्त शाम देशपांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी दिलीप माने, जिल्हा शिक्षण अधिकारी पुनिता गुरव, कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक फारोख कूपर आणि कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि. चे सीईओ झाल कूपर, रुबी हॉल क्लिनीकचे डॉ. परवेज ग्रँट आणि केईएम इस्पितळाच्या भारती पाटील यावेळी उपस्थित होते.

सातान्याचे छत्रपती खासदार उदयनराजे भोसले आणि त्यांच्या पत्नी छत्रपती दमयंतीराजे भोसले यांची या कार्यक्रमातील उपस्थिती विशेष होती.

# फिनोलेक्स व मुकुल-माधव फौंडेशनचे कार्य स्तुत्य

## श्याम देशपांडे : जिल्ह्यातील ३१४ अपंगांना मॉडिफाय खुर्च्यांचे वाटप

**सातारा : प्रतिनिधी**

समाजात चांगले काम करणारे लोक आजही आहेत. त्यामुळेच जगाचे अस्तित्व टिकून आहे. सामाजिक बांधिलकी जोपासत अपंगांना आधार देणारा फिनोलेक्स व मुकुल-माधव फौंडेशनचा उपक्रम स्तुत्य आहे, असे गौरवोद्गार महसूल विभागाचे अतिरिक्त आयुक्त श्याम देशपांडे यांनी काढले.

साताऱ्यात फिनोलेक्स व मुकुल-माधव फौंडेशनच्यावतीने कनिष्क हॉलमध्ये अपंग विद्यार्थ्यांना सेरेब्रल पाल्सी चेअरर्स वाटप करण्यात आले. त्यावेळी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील म्हणाले, मुकुल-माधव फौंडेशननें अपंगांना खुर्च्यांची केलेली मदत मोलाची आहे. त्यामुळे या अपंगांचे कष्ट कमी होवून त्यांच्या मातांनाही मदत होईल. जिल्हा परिषदेचे फौंडेशनला यापुढेही सहकार्य राहिल. श्री. छ. दमयंतीराजे भोसले म्हणाल्या, मुकुल-माधव फौंडेशनने पुण्यात उल्लेखनीय काम केले आहे. त्यांच्या कार्याला पाठिंबा राहिल. डॉ. परवेझ ग्रँन्ट यांनीही मनोगत व्यक्त केले. दरम्यान, जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील दिव्यांग मुलांना मुकुल-माधव फौंडेशन व फिनोलेक्स कंपनीकडून १०० मॉडिफाय चेअर, ३०० व्हील चेअर तसेच ३०० कमोड यांचे वाटप खा. श्री. छ. उदयनराजे भोसले, श्री. छ. दमयंतीराजे भोसले, अतिरिक्त आयुक्त शाम देशपांडे, जिल्हाधिकारी अश्विन मुद्‌गल, मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील, कूपर उद्योग समुहाचे फारुख कूपर, फिनोलेक्स कंपनीच्या



**अपंगांना सेरेब्रल पाल्सी चेअरर्सचे वाटप करताना खा. श्री. छ. उदयनराजे भोसले, श्री. छ. सौ. दमयंतीराजे भोसले, श्याम देशपांडे, अश्विन मुदगल, नितीन पाटील, रितू छाबरिया व इतर.**

डायरेक्टर व मुकुल-माधव फौंडेशनच्या मॅनेजिंग ट्रस्टी रितू छाबरिया, जाल कूपर, यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान, अपंग विद्यार्थ्यांनी 'मेरी माँ', 'खेळताना रंग बाई होळीचा,' या गाण्यांवर रेकॉर्ड डान्स सादर केला. त्याला उपस्थितांनीही दाद दिली. जिल्हा परिषदेच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते रितू छाबरिया यांना मानपत्र देण्यात आले.

कार्यक्रमास प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी पुनीता गुरव, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिलीप माने, मुकुल माधव फौंडेशनचे धानोरकर, डॉ. संजय लावंड, डॉ. भारत पाटील, मंगेश कांचन आदी उपस्थित होते.